## लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि., ज्ञानेश्वरनगर, पो. भेंडे साखर कारखाना, तालुका नेवासा, जिल्हा अहिल्यानगर.

जा.क्र.एफ/सिओ/५६/९०/**५२५२** दिनांक :- १२/०९/२०२६

### : अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस :

(फक्त सभासदांसाठी)

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,ज्ञानेश्वरनगर, पोष्ट भेंडे साखर कारखाना, तालुका नेवासा, जिल्हा अहिल्यानगर या संस्थेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची **'अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा' रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता** ज्ञानेश्वरनगर (भेंडे बु.) येथे कार्यस्थळावर कारखान्याचे चेअरमन मा.श्री. घुले नरेंद्र मारुतराव यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

**: सभेपुढे येणारे विषय :**

१. मागील दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२. मा. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा संस्थेच्या कामकाजाचा अहवाल स्विकारणे व मा. संचालक मंडळाने शिफारस केलेला दि. १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रके मंजूर करणे व नफ्याची शिफारस केलेली विभागणी स्विकारणे.

३. मा. वैधानिक लेखापरिक्षक मे.एस.जे.जे.एस.ॲण्ड कंपनी, पुणे यांचेकडील सन २०२५-२०२६ चा तपासणी अहवाल वाचून नमूद करणे व यापूर्वीचा दोष दुरुस्ती अहवाल स्विकारणे.

४. अ) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता कायद्यानुसार लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविणे.

ब) सन २०२७-२०२८ या आर्थिक वर्षाकरीता इन्कम टॅक्स, व्हॅट, जी.एस.टी. सल्लागार व कॉस्ट, ऊर्जा, सेफ्टी आणि इंटरनल ऑडिटरची नेमणूक करणेबाबत विचारविनिमय करणे.

५. अ) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२७-२०२८ या वर्षाच्या अंदाजपत्रकाला मंजूरी देणे व संचालक मंडळास भांडवल उभारणीचा अधिकार देणे तसेच सन २०२५-२०२६ मधील अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ब) ऊस बिलातील ठेवी संबंधी आवश्यक ते निर्णय घेणे.

६. मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार कारखान्यामधील अनावश्यक वस्तु / भंगार माल विक्रीस व मा.संचालक मंडळाचे शिफारशीनुसार फुटतुटीचे केलेल्या जमाखर्चास कार्योत्तर मान्यता देणे.

७. मा.संचालक मंडळाचे शिफारशीनुसार सोबतचे परिशिष्टात नमुद केल्याप्रमाणे पोटनियमामध्ये सूचविलेल्या दुरुस्तीस मंजूरी देणे व संस्था निबंधकाकडे मंजूरीसाठी शिफारस करणे.

८. मा. अध्यक्ष महाशय यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार

ज्ञानेश्वरनगर

दिनांक १२/०९/२०२६

**अनिल पं. शेवाळे**

कार्यकारी संचालक

(कृ.मा.प.)

**टीप :-**

१. संस्था सभासदांनी प्रतिनिधीचा ठराव ७ दिवस अगोदर कारखान्याकडे पाठवावा.

२. कारखान्याच्या कामकाजासंबंधी सभासदांना काही विधायक सूचना करावयाच्या असल्यास त्या त्यांनी लेखी दि. २४/०९/२०२६ पूर्वी कारखाना ऑफिसला मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

३. अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी आवश्यक ती गणपूर्ती (कोरम) न झाल्यास सदरची सभा कोरम अभावी एक तास पुढे ढकलण्यात येईल आणि अशा पुढे ढकलण्यात आलेल्या वेळी कोरम पूर्ण नसले तरी सभेचे कामकाज कोरमशिवाय त्याचवेळी त्याच ठिकाणी पार पाडले जाईल.

४. सभेच्या जागी सभासदांनाच प्रवेश मिळेल.

५. सभेसाठी प्रवेशपत्रिका सभा मंडपासमोर गेटच्या बाहेर मिळतील, सभासदांना प्रवेश पत्रिकेशिवाय प्रवेश मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६. अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, प्रस्तावीत पोटनियम दुरूस्ती व वार्षिक अहवाल शेतकी खात्यातील कर्मचाऱ्यामार्फत घरपोहोच पाठविणेची व्यवस्था केलेली आहे, तसेच कारखाना कार्यालयात नोटीस बोर्डावर व कारखान्याची अधिकृत वेबसाईट www.lmgpdssk.org वर पहावयास मिळेल.

**बुक पोस्ट**

प्रति,

प्रेषक :

**कार्यकारी संचालक**

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर स.सा.का.लि.,

ज्ञानेश्वरनगर, पो. भेंडे सा.का., ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.